नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 08/05/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
### पोलिस स्टेशन उमरेडची कार्यवाही

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर गंगापुर फाटा येथे दिनांक 07/05/2021 चे 05.00 वा. ते 05. 20 वा. दरम्यान उमरेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच– 36/एए – 2304 क्रमांकाच्या टाटा कंपनीचा योद्धा पिकअप गाडीला थांबवुन तपासणी केली असता त्यामध्ये एकुण 11(गाई,गौरे) कि. 1,00,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना दिसुन आला. आरोपी नामे– रज्जाक अशोक सावरकर, वय 26 वर्ष, रा. पवनी जि. भंडारा याच्या ताब्यातुन 11 जनावरे व वाहन कि. 7,80,000/–रू. असा एकुण किंमती 8,80,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक प्रकाश गोविंद मुटकुरे, पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. उमरेड येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(ह)(क)(ब) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)(ए), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच सहकलम 184, 130/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. किशोर ठाकुर हे करीत आहे.





# पाण्यात बुडुन मृत्यु

पो. स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावर कालीघाट नदीच्या पात्रात येथे दिनांक 07/05/2021 चे 13.00 वा. ते 13.30 वा दरम्यान फिर्यादीचा मुलगा नामे हासिम नंदकिशोर पुरवळे वय 15 वर्ष व भाचा नामे रोहन रंजित भीसे वय 10 वर्ष हे दोन्ही रा. वाघधरवाडी कन्हान हे दोघेही कालीघाट कन्हान नदीच्या पात्रात आंघोळी साठी गेले असता दोन्ही मुलांना कन्हान नदीच्या पाण्यात पोहता आले नाही व ते पाण्यात बुडुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादीनामे– गं भा वजिता नंदकिशोर पुरवळे वय 35 वर्ष रा वाघधरवाडी कन्हान यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. जावेद शेख 9405012310 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर